MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

# Model Answer
## Set- II
### Std. – 10th MM/Semi
### Subject – Marathi H.L.

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

**Time: 3 hrs** **Marks: 80**

## विभाग – १ गद्य

**प्र.१ अ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती सोडवा.**

१) **कोष्टक पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| गुलाबी पानांच्या रेशमी पताका नाचवणारे | → | पिंपळाचे झाड |
| घराजवळ असलेले झाड | → | पिंपळ |
| झाडाला वेढणारी वेल | → | मधुमालती |
| वृक्ष वनस्पतींचा दुष्काळ असणारे राज्य | → | गुजरात |

२) **कोष्टक पूर्ण करा.**

घाणेरीच्या दुरंगी फुलांच्या रंगाचे वर्णन
- शेंदरी व पिवळा
- लाल आणि पांढरा
- शेंदरी आणि जांभळा
- पिवळा आणि जांभळा
- जांभळा आणि गुलाबी

३) वसंत ऋतूचे हृदय म्हणजे चैत्र महिना! चैत्र हा वसंतात्मा, मधुमासच आहे. नवपल्लवांनी गर्द झाकलेल्या फुलांनी बहरून गेलेल्या वृक्षलतांचे दर्शन याच महिन्यात होते. पिंपळाच्या झाडाखाली जुनी पाने गळून पडलेली असतात. झाडावर जेव्हा भडक गुलाबी रंगांची पाने चमकतात तेव्हा असे वाटते की, जणू काही सुंदर पुष्पांचे गेंदच या झाडांवर फुलले आहेत की काय किंवा गहि-या गुलाबी पानांच्या रेशमी पताका नाचवत ही झाडे उभी आहेत असा भास होतो. या झाडांची पाने अन्य झाडांच्या तुलनेत मोठी असल्याने या पानांची सळसळ सारखी सुरुच असते.

**ब) पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१) **कोष्टक पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| कापसासारखे पांढरे शुभ्र केस असलेली | → | रूपाली |
| सुभाषची मुलगी | → | दिपाली |
| सोन्यासारखे केस असलेली | → | सोनाली |
| लेखकाचे डॉक्टर मित्र | → | डॉ. चित्रे |

२) **योग्य घटनाक्रमानुसार लिहा.**

क) रूपालीचे लेखकाच्या घरी आगमन. ब) लेखकाच्या घरी दीपालीचा जन्म.

अ) सोनाली घरी आली. ड) सिंहीणीचे नाव ठेवले 'सोनाली.'

३) लेखक त्यांच्या पूर्वजांपेक्षा अधिक उदात्त पातळीवरून विचार करतात. त्यांच्या पूर्वजांनी वन्य प्राण्यांची शिकार केली, त्यांना मारले. लेखकांना मात्र वन्य प्राण्यांशी प्रेमाने वागावे, त्यांना माणसाळावे अशी मनोमन इच्छा आहे.

ही गोष्ट ते शाब्दीक पातळीवर किंवा कल्पनेच्या पातळीवर ठेवत नाहीत. ते प्रत्यक्ष कृतीच करतात. म्हणून ते सिंहीणीचे पिल्लू पाळायला आणतात. सिंहीणीला आपण माणसाळवू शकू, तिला प्रेमाने जिंकू अशी जणू काही लेखकांना मनोमन खात्री होती. लेखक स्वतः प्राण्यांशी आत्मीयतेने वागले, पण त्यांनी घरातल्या सगळ्यांना त्या प्राण्यांशी स्वतःप्रमाणेच वागायला शिकवले. आपल्या चिमुकल्या नातीलासुद्धा निर्धास्तपणे त्यांच्याबरोबर खेळू दिले. रूपाली, सोनाली व दीपाली ही नावे पाहा. तीन बहिणींची नावे असावीत, असे त्यांच्या उच्चारांवरून वाटते. ती दोन्ही पिल्ले त्यांना स्वतःच्या नातीइतकीच प्रिय होती. या सर्व बाबींवरून लेखकांची प्राण्यांकडे पाहण्याची निर्मळ वृत्ती दिसून येते.

**क) पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१) अ) पूर्ण करा.**

आनंद ← काव्यात असते → दुःख

ब) पूर्ण करा.

| | | |
|---|---|---|
| दुःखामधून कवी निर्माण करतो | → | करुणरस |
| दुःखामधून विनोदी माणूस निर्माण करतो | → | हास्यरस |

२) **एका वाक्यात उतारे लिहा.**

अ) दुःखाकडे गांभीर्याने पहिले तर दुःखे वाढतात.

ब) खेळकरपणाने पहिले तर दुःखे कमी होतात.

**विभाग – २ गद्य**

**प्र. २ अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१)** कोष्टक पूर्ण करा.

| वस्तूची माणसासारखी असणारी वैशिष्ट्ये लिहा. | |
|---|---|
| i) सेवक असतात | ii) जपावे लागते |
| iii) प्रेमाने वागल्यास सुखावतात | iv) हक्क शाबूत ठेवावा लागतो |

**२) कारणे लिहा.**

अ) वस्तूंना जपावे आणि त्यांचे लाड ही करावेत, कारण वस्तू नंतरच्या काळातही आपला स्नेह जिवंत ठेवणार आहेत.

ब) वस्तूंना हक्काच्या घरात राहू दिले जात नाही कारण वस्तूंचे आयुष्य संपलेले असते.

**३)** स्वच्छतेची आवड जशी माणसांना असते तशी ब-याच प्राण्यांनाही असते. मग तो प्राणी लहान असो वा मोठा पण निर्जीव वस्तूंचा स्वच्छतेशी फारसा संबंध नसतो. कारण या निर्जीव वस्तूंना माणसाला स्वच्छ करावे लागते. माझ्या मते प्रत्येक वस्तूला दररोज साफ करून, घासूनपुसून स्वच्छ केले पाहिजे. कारण प्रत्येक वस्तू ही माणसाच्या उपयोगी पडत असते. त्या वस्तूंची आपण काळजी घेतली म्हणजे त्या वस्तू अधिक काळ आपल्याला सेवा देतात. म्हणूनच वस्तूंनाही स्वच्छतेची आवड असते, असे या काव्यपंक्तीतून कवीने सुचवले आहे.

**४)** प्रस्तुत काव्यपंक्ती 'वस्तू' या द. भा. धामणस्कर यांच्या कवितेतील असून ही कविता मुक्तछंदात रचलेली आहे. वस्तूनांही भावना असतात हे समजून वस्तू वापराव्यात. वस्तूंशी निगडीत स्नेह जपावा ही भावना या कवितेतून

व्यक्त झाली आहे. कोणत्याही निर्जीव वस्तूशी मानवी भावना जोडली गेली, की ती वस्तू अनमोल ठरते. वस्तू माणसाची एखाद्या प्रामाणिक सेवकासारखी मनापासून सेवा करतात. परंतु त्या निर्जीव असल्यामुळे आपण त्यांच्याकडे फारसे लक्ष देत नाही, कवीच्या मते वस्तू जरी त्या आपल्या सेवक असल्या तरी आपण त्यांना सन्मानाने वागवले पहिजे. त्यांना बरोबरीचा मान दिला पाहिजे. प्रत्येक वस्तू आपल्या उपयोगी पडते म्हणून त्यांची मनापासून काळजी घेतली पाहिजे. वस्तू कशा महत्त्वाच्या असतात, त्या माणसाला दीर्घकाळ साथ देतात, आपण वस्तूंची नीट देखभाल केली पाहिजे असे अतिशय साध्या, सोप्या भाषेत कवी या काव्यपंक्तींमधून सुचवतात.

**ब) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.**

| | | **तू झालास मूक समाजाचा नायक** | **उत्तम लक्षण** |
|---|---|---|---|
| १) | कवितेचे कवि/ कवयित्री – | ज. वि. पवार | संत रामदास |
| २) | कवितेचा रचनाप्रकार – | गद्यात्मक, निवेदनात्मक शैली | ओवी |
| ३) | कवितेतून मिळणारा संदेश – | या कवितेतून डॉ. आंबेडकर या दलित समाजातून उन्नत झालेल्या थोर समाजनायकाला विनम्र अभिवादन केले आहे. त्यांच्या कर्तृत्वाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा, असा संदेश दिला गेला आहे. | मनुष्याने उत्तम पुरूष बनण्यासाठी सत्याच्या मार्गाने जावे, विवेकाने वागावे आणि सत्कीर्ती वाढवावी असा बहुमोल संदेश प्रस्तुत काव्यातून दिला आहे. |

**क) रसग्रहण** –

भातुकलीतलं जग हे स्वप्नाळू असते. त्यातला संसार लुटूपुटूचा असतो. परंतु मोठेपणी प्रत्यक्ष संसारातील जबाबदा-या या वास्तववादी असतात. त्यामुळे भातुकलीच्या स्वप्नाळू जगातून प्रत्यक्ष वास्तवात प्रवेश करताना बदल आवश्यक ठरतो. असे कवयित्रींना सुचवायचे आहे. स्त्री आणि पुरूष यांची परस्परांना साथ असेल, सामंजस्याने व सहकार्याने ते जगात वावरतील असे कवयित्री 'नीरजा' यांना वाटते. एकमेकांना सहकार्य करणारे स्त्री-पुरूष परस्परांची कामे एकत्र मिळून करतील, हे कवयित्रींना सुचवायचे आहे. कवयित्रीने प्रस्तुत काव्यपंक्तीतून आपल्यासमोर 'आश्वासक चित्र' रेखाटताना आपल्याला एक प्रकारचे आश्वासन दिले आहे. स्त्री-पुरूष समानता जरी आजच्या काळात, आजच्या परिस्थितीत नसली तरी नजीकच्या भविष्यकाळात निश्चितपणे साकारता येईल असा कवयित्रीचा ठाम विश्वास आहे. या ठिकाणी बाहुली ही स्त्रीचे व चेंडू हा पुरुषांचे प्रतिनिधीत्व करतो असे मला वाटले. आज भातुकलीचा खेळ खेळणारी मुलगी व चेंडू खेळणारा मुलगा हे दोघेही भातुकलीच्या या लुटूपुटूच्या खेळातून लवकरच बाहेर पडतील आणि वास्तवात प्रवेश करताना दोघांचा हात एकमेकांच्या हातात असेल म्हणजेच स्त्री पुरुषांतील असमानता, भेदभाव पूर्णपणे नष्ट झालेला असेल आणि दोघांमध्ये स्नेहभाव निर्माण झालेला असेल, असे कवयित्रींना वाटते.

**विभाग ३ – स्थूलवाचन**

**प्र. ३ कोणत्याही दोन कृती सोडवा.**

१) आजचा काळ हा धकाधकीचा असून वाढत्या शहरीकरणामुळे मानवाचे जीवन यांत्रिक होत आहे. मानवसमाज

जात, धर्म, पंथ, भाषा यामध्ये विखुरला गेला आहे. सामाजिक विद्वेष वाढत आहे. अशा वेळी समाज घटकांना जोडणारा घटक म्हणजे 'मानवतावादी' दृष्टिकोन होय. माणसाचे माणसाशी असणारे वर्तन हे माणसाप्रमाणे असावे. आपापसांत सलोखा असावा. समता, बंधुता आणि मानवतेच्या तत्त्वांचे पालन करावे. 'एकमेकां सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीने माणसाने वागण्याची व एकमेकांना आधार देण्याची गरज आहे.

२) व्युत्पत्ती म्हणजे एखाद्या शब्दाच्या किंवा अर्थाच्या मुळाचे ज्ञान होय. व्युत्पत्ती सांगणे म्हणजे एखाद्या शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे होय. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश! व्युत्पत्ती कोशाचे कार्य पुढीलप्रमाणे चार प्रकारे चालते: १) मराठी भाषेतील – प्रमाण व बोली – शब्दांचे मूळ रूप दाखवणे. २) विशिष्ट प्रदेशात व भौगोलिक परिसरात एकाच शब्दातील उच्चरात बदल होत असतो. हा शब्दाच्या उच्चारतील बदल व फरक दाखवणे. ३) भाषेमध्ये इतिहासाच्या दृष्टीने फरक होत असतात. भिन्न भिन्न काळात जे शब्दांत बदल होतात, त्या बदलांचे कारण स्पष्ट करणे. ४) भिन्न भिन्न समाजांत वेगवेगळ्या कारणांनी शब्दाच्या अर्थाच्या अंगाने ही बदल संभवतात. हे अर्थातील बदल स्पष्ट करणे.

३) विवाहानंतर अल्पकाळातच वैधव्य प्राप्त झालेल्या स्वाती महाडिक यांनी आपली दोन्ही अपत्ये - मुलगा स्वराज आणि मुलगी कार्तिकी यांना आपले पती कर्नल संतोष महाडिक यांच्याप्रमाणे मिलिटरीचे शिक्षण देऊन सैन्यात भरती करण्याचा ठाम निर्धार केला होता. निर्धार पक्का असला की मार्ग खुलेच असतात. देशाला दोन फौजी देण्यात मला खूप आनंद वाटेल असं त्यांना मनापासून वाटायचं. त्यासाठी त्यांनी स्वतः पतीच्या निधनानंतर सैन्यात भरती व्हायचा निश्चय केला. रात्रंदिवस अभ्यास करुन त्या स्टेट सिलेक्शन बोर्डाची अत्यंत अवघड परीक्षा पहिल्याच प्रयत्नात यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्या. लेफ्टनंट पदासाठी चेन्नईच्या कॅम्पमध्ये ट्रेनिंग सुरू झाले. आपल्या सध्यायांपेक्षा दहा-बारा वर्षांनी मोठया असणा-या स्वाती या खडतर प्रशिक्षणात कायम आघाडीवरच होत्या अशा रीतीने स्वाती महाडिक यांचे कठोर परिश्रम त्यांचा निर्धार पूर्ण करू शकले.

## विभाग ४ – भाषाभ्यास

**प्र. ४ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती**

**१) समास – कोष्टक पूर्ण करा.**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| प्रतिक्षण | प्रत्येक क्षणी | अव्ययीभाव समास |
| बारभाई | बारा भाईंचा समूह | द्विगू समास |
| लोकप्रिय | लोकांना प्रिय | विभक्ती तत्पुरूष समास |
| नेआण | ने आणि आण | इतरेतर द्वंद्व समास |

**२) शब्दसिद्धी.**

अ) दोन अभ्यस्त शब्द लिहा, जसे वळवळ – i) सळसळ ii) मळमळ

ब) ‘अ’ हा उपसर्ग असलेले दोन शब्द लिहा – i) असमंजस ii) असमर्थ

**३) वाक्प्रचार – पुढीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

i) तोंडावर येणे – जवळ येणे.

वाक्य – दिवाळी तोंडावर आल्यामुळे सर्वांनी घराची साफसफाई केली.

ii) कपाळाला आठी घालणे – नापसंती दर्शविणे.

वाक्य – इतिहासाचा तास रंगात आलेला असताना शिपाई आल्याने शिक्षकांनी कपाळाला आठी घातली

iii) गुण्यागोविंदाने नांदणे – प्रेमाने एकत्र राहणे.

वाक्य – आमच्या सोसायटीमधील सर्व सदस्य एका कुटुंबासारखे गुण्यागोविंदाने नांदतात.

iv) उपेक्षा करणे – दुर्लक्ष करणे.

वाक्य – साहिल नेहमी गरीब तुषारची उपेक्षा करतो.

**आ) भाषासौंदर्य.**

१) **शब्दसंपत्ती.**

i) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.

अ) ज्याचे आकलन होत नाही असा – अनाकलनीय   ब) कोणतेही काम जबाबदारीने न करणारा – बेजबाबदार

ii) समानार्थी शब्द लिहा.

अ) वसुंधरा – पृथ्वी, धरा, अवनी.   ब) आनंद – मोद

iii) विरुद्धार्थी शब्द वापरुन वाक्य पुन्हा लिहा.

अ) सावकाश – भराभर, घाईने.   ब) गोंधळ – शांतता,

२) **लेखननियमांनुसार लेखन** – अचूक शब्द ओळखा.

i) निर्णय   ii) मृत्यू   iii) शताब्दी   iii) प्रसिद्ध

३) **विरामचिन्हे.** दिलेल्या वाक्यात विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.

"काय मालक? हे कासव कोठून आणलं? तो किती सावकाश काम करतो बघा."

४) **पारिभाषिक शब्द.**

i) खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा.

अ) Selection – निवड   ब) Now – आत्ता

**विभाग ५ – उपयोजित लेखन**

**प्र.५ अ)**

१) खालील जाहिरात वाचून कोणतेही एक पत्र लिहा.

दि. १४ ऑक्टोबर २०२२

प्रति,

मा. व्यवस्थापक,

ड्रामा किंग, एरंडवणे,

कर्वे रोड, पुणे – ४११००४

विषय – स्नेहसंमेलन व वेशभूषा स्पर्धेसाठी सामग्री मागविणेबाबत.

महोदय,

मी अभिनव विद्यालयाचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मा. मुख्याध्यापकांच्या परवानगीने हे पत्र लिहीत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आमच्या विद्यालयामध्ये स्नेहसंमेलन व वेशभूषा स्पर्धा आयोजित केली

आहे. त्यासाठी लागणा-या सामग्रीची यादी खाली देत आहे. शनिवार दि. ४ मे रोजी सायंकाळी ६ वा. कार्यक्रम चालू होणार आहे.

कार्यक्रमाच्या एक तास आधी आपण यादीप्रमाणे सामग्री पाठवावी. अनामत रक्कम किती ठेवायला हवी ते सांगितल्यास रक्कम पाठविण्याची व्यवस्था करता येईल.

| सामग्रीचे नाव | | संख्या |
|---|---|---|
| १) | नऊवारी साड्या | १२ |
| २) | मावळयांचे ड्रेस | १२ |
| ३) | तलवारी | १२ |
| ४) | मावळी पगडी | १२ |
| ५) | झाशी राणी ड्रेस | १ |
| ६) | बाजीराव पेशवे सेट | १ |
| ७) | शिवाजी महाराज सेट | १ |

तरी कृपया वरील वस्तू वेळेवर पाठवाव्यात. तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू,

अ. ब. क.

विद्यार्थी प्रतिनिधी

अभिनव विद्यालय,

शिवाजीनगर, पुणे - ४११००९

abc@gmail.com

२) **सारांशलेखन** –

दु: खांनी भरलेल्या जगात असहा य माणसाने कसे जगायचे? ही दु:ख नाहीशी करण्याचे सामर्थ्य तर त्यांच्या अंगी नाही; पण निदान हया दु:खाच्या नांग्या त्याला तोडता आल्या आणि त्याच्या यातना त्याला कमी करता आल्या तरी त्याला तेवढे पुरे आहे. जगातील दु: खांकडे गांभीर्याने पाहिले तर ती वाढतात आणि खेळकर पणाने पाहिले तर ती कमी होतात. हे प्रथम ज्या माणसाच्या लक्षात आले तो खरा विनोदाचा जनक असे म्हणावयास हरकत नाही. दु:खांना हसवयाचे. हसून ती विसरून जावयाचे हा विनोदाचा खरा हेतू आहे. जगातील दु:खे हाच खरा विनोदाचा विषय आहे. काव्यात केवळ आनंदच असतो आणि दु:खे नसते असे नाही; पण दु;खाकडे पाहण्याच्या, काव्याच्या आणि विनोदाच्या दृष्टिकोनात फार मोठे अंतर आहे. दु;खामधून कवी करूण रस निर्माण करतो. तर विनोदी माणूस त्याच दु;खांना हास्यरसाच्या पुरात बुडवून टाकतो.

**आ) पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

१) **जाहिरात लेखन** –

वाचाल तर वाचाल

**प्रगती वाचनालय**

लहान मोठ्यांसाठी पुस्तकांचा खजिना घेऊन आले आहे

| |
|---|
| मोठ्यांसाठी कथा, कादंब-या, मासिके,<br>बच्चे कंपनीसाठी बालकथा, चांदोबा, कार्टून स्टोरी,<br>सर्वांसाठीच उपयुक्त शब्दकोश, डिरेक्टरी, निबंध, शोध कथा, विज्ञान कथा, आत्मचरित्र इ.<br>उपलब्ध<br>घरपोच पाठविण्याची सोय<br>संपर्क – प्रगती वाचनालय<br>मधुबन सोसायटी, तुकाईनगर, पुणे – ४११०५४<br>फोन नो. २४४५५६६८ |

२) **बातमीलेखन** –

तितली वादळाचे बारा बळी

दिनांक १४ ऑक्टोबर, भुवनेश्वर (आमच्या वार्ताहराकडून) तितली वादळाचा तडाखा बसल्यामुळे ओरिसातील काही जिल्ह्यात जोरदार पाऊस झाला. काही ठिकाणी भूस्खलनामुळे नागरिकांचा मृत्यू झाला; तर अनेकजण बेपत्ता असल्याची माहिती विशेष मदत आयुक्तांनी दिली. पूर व वादळामुळे बेघर झालेल्या नागरिकांसाठी छावण्या उभ्या करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय आपत्ती निवारण दल तात्काळ आपत्तीग्रस्त भागात मदतीसाठी गेले आहेत. भारतीय नौदल सेनेकडून हेलिकॉप्टरची सोय नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हाधिका-यांनी पाहणी करुन अहवाल तयार केला आहे. अहवालानुसार आपत्तीग्रस्त नागरिकांना योग्य ती मदत पुरवण्याचे आश्वासन जिल्हाधीका-यांनी दिले. येत्या २४ तासात किनारपट्टी भागात सोसाट्याच्या वा-यासह पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. नागरिकांना सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे. आपत्तीग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन अनेक समाजसेवी संस्थांनी केले आहे. मदतीसाठी www.helporisa.com या वेबसाइटला भेट द्या.

३) **कथालेखन** –

प्रसंगावधानाचे पारितोषिक

श्यामू आपल्या आईबरोबर रेल्वे रुळाजवळील झोपडपट्टीत राहात होता. त्याचे घर अगदी साधे व झोपडीवजा होते. आई कामाला गेली की शामू तसा न् तास गाड्या निरखत असायचा रुळावरून वेगाने धावणा-या गाड्या पाहायला त्याला खूप आवडायचे.

पावसाळ्याचे दिवस होते. एके दिवशी बेफाम पाऊस झाला. रात्रभर धो धो पाऊस कोसळत होता. अन् भयंकर अशा सोसाट्याच्या वा-याने त्यात भरच घातली होती. ठिकठिकाणी खूप पाणी साठले होते. शामू सकाळी उठल्यापासून रुळावरून वाहणारे पाणी पाहत होता. त्याला खूप मजा वाटत होती.

रुळावरून वाहणारे पाणी पाहत पाहत तो घरापासून खूप दूर आला. अचानक त्याला एके ठिकाणी रेल्वेचे रुळ उखडलेले दिसले. आता काय घडू शकेल, हे क्षणात त्याच्या लक्षात आल. त्याच वेळी दूरवरून येणा-या गाडीचा आवाज श्यामूच्या कानावर आला. ही गाडी येथे आली तर भयंकर अपघात घडेल, हे श्यामूच्या लक्षात आले. थोड्याच अवधीत काहीतरी करणे आवश्यक होते. श्यामू विचार करू लागला. एकढ्या लोकांचे प्राण...... पण ते वाचवायलाच हवेत.

श्यामूने चटकन अंगातला शर्ट काढला. सुदैवाने त्याने आज तांबड्याच रंगाचा शर्ट घातला होता. श्यामू तो शर्ट

फडकवत रुळावरून धावू लागला. हे पाहून रेल्वे मोटरमनने गाडी थांबवली. घाईच्या वेळी गाडी थांबली म्हणून सर्व प्रवासी चिडले. काहीजण गाडीतून खाली उतरले. मोटरमनही खाली उतरला आणि श्यामूच्या दिशेने पुढे गेला. तेव्हा त्याची नजर रुळावर पडली. पाहतो तो काय......! रुळ उखडून गेलेले! त्याला भयानक परिस्थितीची कल्पना आली अन् श्यामूच्या कृतीचा उलगडाही झाला. धावत जाऊन त्याने उघड्या श्यामूला उचलून घेतले.

एवढ्यात गाडीतले काही प्रवासीही तेथे आले. आणि श्यामूचे प्रसंगावधान त्यांच्याही लक्षात आले. सर्वांनीच त्यांचे कौतुक केले. अनेकांचे डोळे अश्रूंनी भरून आले. एवढ्याशा श्यामूचे सर्वांनीच मनापासून कौतुक केले. आज हजारो लोकांचे प्राण त्याने वाचवले होते. श्यामूच्या रूपाने जणू परमेश्वरच आपल्या भेटीस आल्याचा भास काहींना झाला. त्यांनी श्यामूचे अनंत ऋण मनात साठवून ठेवले. श्यामूवर बक्षिसांची खैरात झाली. गाडीच्या मोटरमननेही श्यामूचा नाव-पत्ता घेऊन घडलेली घटना रेल्वेच्या कार्यालयात कळवली. पुढे प्रजासत्ताक दिनाच्या वेळी श्यामूचे आयुष्य पालटले. आज शिक्षण घेऊन समाजऋणाचे महत्त्व तो लोकांना सांगतो आहे.

तात्पर्य – प्रसंगावधान राखून योग्य कृती करावी अन् समाजऋणातून उतराई होण्याचा प्रयत्न करावा, माणुसकीचा धडा लोकांना शिकवावा.

**इ) खालीलपैकी एक कृती सोडवा.**

२) ‘राष्ट्रीय एकात्मता’ या विषयावर निबंध लिहा.

राष्ट्रीय एकात्मता

भारत देश! माझा देश! खरे आहे. या माझ्या देशाला खूप प्राचीन संस्कृती आहे. या देशाचा अतिशय मोठा इतिहास आहे. या देशात अनेक प्रकारची विविधता आढळून येते. धर्म, भाषा, पोशाख, चालीरीती, अशा गोष्टीत विविधता आढळते. देशाची प्रांतवार रचना झाली आहे. एवढेच काय ह्या देशात सहा ऋतू आहेत. सृष्टीही नटलेली, सुजलाम, सुफलाम आहे. अशा प्रकारे अनेक प्रकारची विविधता असुनही आम्ही सर्व एक आहे हे कशावरून? परकीय आक्रमणे, परकीय सत्ता व नैसर्गिक संकटांना तोंड देणे एकात्मतेनेच शक्य झाले व याचे दर्शन भारतीय नागरिकांच्या एकत्मतेतून जगाला मिळाले.

भारत देशातील प्रत्येक धर्माचा धर्मग्रंथ निराळा असला तरी शिकवण एक असल्याने एकात्मताही टिकून राहिलेली दिसून येते. प्राचीन काळापासून पारमार्थिक बैठक असलेली संत परंपरा प्रत्येक प्रांतात दिसून येते. त्यामुळे उत्तम विचारांची परंपराही निर्मितच आहे. यामुळे एकत्मतेचा वारसाही प्राचिनच आहे. तत्वन्याची ओळख करून घेतली असता एकत्मतेचाच संदेश मिळतो.मग ते विचार कोणत्याही तत्ववेत्याचे असोत. आमच्या ह्या देशावर दीडशे वर्षे गुलामगिरीचे परकीय वर्चस्व होते.ती गुलामगिरी एकीच्या बळावरच नष्ट झाली.एकीचे, तत्वाचे, विचारांचे, विलक्षण बुद्धीचे आम्हा देशभक्तांचे वैभव पाहून इंग्रज सरकारही घाबरून गेले.

आज मात्र आपण २१ व्या शतकात वावरत आहोत. कलियूगाची खात्री पटत आहे. आज लोकसंख्या व भ्रष्टाचाराच्या भस्मासुर वाढत आहे. प्रांत वाद वाढत आहे. याचा फायदा लोक घेत आहेत. शेकडो देश बांधव अन्याय झाल्याने किंवा निरपराधी असूनही या वादांमध्ये बळी पडत आहेत. आपल्या राष्ट्रीय संपत्तीचा उपभोग घेण्याऐवजी तिचा सत्यानाश होत आहे. याला खरंच उपाय आहे. पहिला उपाय म्हणजे एकीने जगणे. धर्म भेद, प्रांत भेद हे कुठे तरी थांबवायला हवेत. एकतेचे बळ महान आहे. अहो साधे पक्षी एकीच्या भावनेने एकत्रित राहून सर्वांचेच रक्षण करतात. मग विचरशील, जाणत्या, सत्त्वशील माणसाला एकी टिकविण्यास काय होते? एकी नसेल तर आता मात्र गुलामी स्वीकारावी लागेल. दिवंसेदिवस परकीय सत्ता येणार काय? असे वाटत नाही. आम्हा

भारतीयांमध्ये मतभेद असतील पण आम्ही काही झाले तरी एकतेचा नाश करणार नाही.

आपली प्रतिज्ञा आपल्याला हेच शिकवते की आम्ही सारे भारतीय आहोत. आम्ही या परंपरेचे पाईक होऊ. उज्वल भवितव्य घडवू. आम्ही सर्व एकतेने राहू. सैनिकांची एकत्र परेड, शिस्त व एकी सहज शिकवून जाते. अनेक संस्था, घटक, राजकारण, समाजकारण, नीती, कुठेच एकते शिवाय पर्याय नाही. भारतीय संस्कृती सर्वातआधी ज्ञानाचा एकीचा सत्कार करण्यास उभी राहील. देशाच्या स्वावलंबनासाठी सुद्धा आपल्या एकीचीच गरज आहे. आपली वैदिक परंपराही हेच सांगते. श्रीकृष्ण हा संस्कृतीतील महत्वाचा ईश्वरी घटक, त्याने बाळगोपाळांना एकत्र केले. एकत्रित शिदो-या सोडून एकत्रित खायचे. सृष्टीच्या शाळेत गुरावासरांसह एकत्रित जायचे. गोपाळकाला म्हणजे एकीचेच प्रतीक नव्हे काय?

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे खरे वैभव |